परिपत्रक क्र. २४

रयत शिक्षण संस्था,सातारा
अकौंट विभाग
दिनांक: २१/१०/२०२४

सर्वश्री शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था,सातारा
यांना----

**विषय:-प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्याल व व्यवसाय शिक्षण विभागाकडील लमसम सेवक मानधनापोटी ॲडव्हान्स देणेबाबत.**

**उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आपल्या शाखेच्या अनुदानित/विना अनुदानित कार्यरत असलेले लमसम/** CHB तत्वावरील नेमलेल्या सेवकांना खालीलप्रमाणे मानधनापोटी ॲडव्हान्स रक्कम अदा करावी.

१. CHB / लमसम नेमणूक सेवक :-

I. विनाअनुदानित व स्वंयअर्थसहाय्यित शाखेमध्ये लमसम, तासिका, तत्वांवर (CHB) नेमणूकीबाबत संस्थेकडून ज्या त्या वेळी नेमणूक आदेश दिलेले असतात. सदर सेवकांचे नेमणूक आदेशाप्रमाणे प्रतिमहा मानधन संबंधित सेवकास अदा करण्यात यावा.

तथापि ज्या सेवकांना संस्थेने नेमणूक आदेश दिलेला नाही अशा स्थितीत स्थानिक स्कूल कमिटीच्या परवानगीने लमसम नेमणूक केली असल्यास त्या सेवकाच्या मानधनास मा. सहसचिव (माध्य),रयत शिक्षण संस्था,सातारा यांची पूर्व परवानगी घ्यावी व मानधन अदा करावे.

II. अनुदानित शाखेमध्ये तासिका तत्वांवर(CHB) नेमणूक केलेल्या सेवकांना शासनाच्या मान्यतेच्या अपेक्षेवर मासिक वेतनाच्या ७०% रक्कम ॲडव्हान्स म्हणून देण्यात यावी. सदर सेवकांच्या मानधनाबाबत शासनाकडून / संस्थेकडून मान्यता आल्यानंतर पूर्वी दिलेल्या ७०%ॲडव्हान्स रक्कम जमा करून घ्यावी व उर्वरीत ३०% रक्कम संबंधित सेवकांना अदा करून १००% रक्कम सेवकांच्या मासिक मानधन खाती खर्च टाकून मासिक वेतनाचा व्यवहार पूर्ण करावा. तथापी ७०% रक्कम ॲडव्हान्स म्हणून सेवकांना अदा करतेवेळी संस्थेची मान्यता घेणे आवश्यक नाही.

III. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व त्यापूर्वीच्या प्रलंबित मान्यता :- संस्थेच्या विविध शाखांमध्ये शाखेच्या आवश्यकतेनुसार सेवकांची नेमणूक लमसम तत्वांवर /CHB तत्वांवर करण्यात आलेली होती. नेमणूक केलेल्या सेवकांना नेमणूकीवेळी मानधनाचे आदेश दिलेले होते. तथापी संबधित सेवकांच्या मानधनाबाबत शासनाकडून मान्यता प्रलंबित असल्यास किंवा मान्यता मिळणारच नाही, याची योग्य ती खात्री झाल्यानंतर संबंधित सेवकांना दिलेला ॲडव्हान्स रक्कम

**जमा करून घेवून त्यांच्या मासिक मानधन खाती खर्च टाकणे बाबत मा.सचिवसो,रयत शिक्षण संस्था सातारा याची मंजूरी घेवून मानधन व्यवहार पूर्ण करण्यात यावा.**

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था,सातारा.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा.सहसचिव, (उ.शि.)रयत शिक्षण संस्था,सातारा
२) मा.सहसचिव,(माध्य.)रयत शिक्षण संस्था,सातारा
३) मा.सहसचिव,(ऑडिट.)रयत शिक्षण संस्था,सातारा
४) सर्वश्री विभागीय अधिकारी,रयत शिक्षण, संस्था,म.वि.सातारा, द.वि.सांगली,प.वि.पुणे,उ.वि.अहमदनगर,रायगड वि.पनवेल.